प.क्रमांक :दिव्यांग/आरक्षण/प्रशा-२/१९०/७५७
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन,
प्रशासकीय इमारत, ८ वा मजला,
शासकीय वसाहतमुंबई , उपनगर जिल्हा,
वांद्रे (पु), मुंबई - ४०० ०५१.
दिनांक : १९/०७/२०२१

**विषय:- संचालनालयातील दिव्यांग अधिकारी/कर्मचा-यांची माहिती उपलब्ध करून देणेबाबत.**

**संदर्भ:- १) शासन निर्णय क्र. दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६-अ, दि. २९/०५/२०१९.**
**२) शासन निर्णय क्र. दिव्यांग २०१५/प्र.क्र.१७१/१६-अ, दि. ०५/०७/२०२१.**

परिपत्रक

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयांनुसार, दिव्यांग अधिकारी/कर्मचा-यांना पदोन्नतीमध्ये ४% आरक्षण देण्यासाठी खालील अ ते इ हे दिव्यांग प्रकार विचारात घेतले आहेत. तरी, संचालनालयातील जे अधिकारी/कर्मचारी खालील (अ) ते (इ) मधील दिव्यांग प्रकाराचे सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र धारक आहेत त्यांनी त्यांची माहीती (ते अ ते इ पैकी कोणत्या दिव्यांग प्रकारात मोडतात व त्याबाबत सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र) ते कार्यरत असलेल्या विभागातील प्रादेशिक कार्यालयास व मुख्य कार्यालयास empdetails.des@hotmail.com या ईमेल वर दि.२५/०७/२०२१ पर्यंत उपलब्ध करून द्यावी.

अ) अंध / अल्पदृष्टी
ब) कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता
क) अस्थीव्यंगता / मेंदुचा पक्षाघात (Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (Leprosy cured) / शारीरिक वाढ खुंटणे (Dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (Acid Attack Victims) / स्नायु विकृती (muscular dystrophy)
ड) स्वमग्नता (Autism) / मंदबुद्धी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability) / विशिष्ट शिक्षण अक्षमता (Specific learning disability) / मानसिक आजार (Mental Illness)
इ) वरील अ ते ड मधील बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व.

दि.२५/०७/२०२१ पर्यंत माहिती व दिव्यांग प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास व त्यामुळे पदोन्नतीपासून वंचित रहावे लागल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची राहील, याची नोंद घ्यावी.

सदर परिपत्रक संचालनालयाच्या www.mahades.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(भू. वि. देशपांडे)
उपसंचालक (प्रशासन)
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई

प्रति:- सर्व अधिकारी/कर्मचारी, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन.

प्रत:- १. सहसंचालक, प्रादेशिक कार्यालय, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नवी मुंबई / पुणे / नाशिक /औरंगाबाद / अमरावती/नागपूर. (यांना विनंती करण्यांत येते की, सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व गट अ ते ड संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणावे. आपल्या विभागातील सर्व दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांची माहिती एकत्रित करून प्रमाणपत्रासह दि. २५/०७/२०२१ पर्यंत संचालनालयाच्या empdetails.des@hotmail.com या ईमेल आयडी वर पाठवावी, ही विनंती.)

२. उपायुक्त नियोजन, विभागीय आयुक्त कार्यालय, नवी मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/ अमरावती/नागपूर.
३. जिल्हा नियोजन अधिकारी (सर्व)
४. जिल्हा मानव विकास अधिकारी (सर्व)
५. जिल्हा सांख्यिकी अधिकारी, (सर्व)

प्रत :

१. अपर संचालक (सर्व) []
२. सहसंचालक (सर्व) []
३. प्रशासन शाखा -१/२/३/४ []
४. निवड नस्ती []

अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
मुख्य कार्यालय, मुंबई